
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

18 MAY 2025
पुढारी

# आपला परिसर प्लास्टिकमुक्त करण्याचा युवकांनी संकल्प करावा

- राज्यपाल राधाकृष्णन यांचे प्रतिपादन
- एक भारत श्रेष्ठ भारत उपक्रमांतर्गत सिक्कीम राज्य स्थापना दिवस राजभवन येथे साजरा




**कोल्हापूर : राजभवन येथे सिक्कीम राज्य स्थापना वर्धापन दिन कार्यक्रमात बोलताना कुलपती सी. पी. राधाकृष्णन. व्यासपीठावर विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के आदी.** (छाया : नाज ट्रेनर)

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

काश्मीरपासून कन्याकुमारीपर्यंत देश प्लास्टिक कचऱ्याने विद्रुप होत आहे. सिक्कीम मात्र देशातील सर्वाधिक कमी प्रमाणात प्लास्टिकचा वापर करणारे राज्य ठरले आहे. ही गोष्ट महाराष्ट्रासह इतर सर्व राज्यांनी शिकण्यासारखी असून युवकांनी किमान परिसर प्लास्टिक मुक्त करण्याचा संकल्प केला, तर देश पुन्हा एकदा सुजलाम सुफलाम होईल, असे प्रतिपादन राज्यपाल तथा राज्य विद्यापीठांचे कुलपती सी. पी. राधाकृष्णन यांनी केले.

सिक्कीम राज्याचा ५० वा राज्य स्थापना वर्धापन दिवस राज्यपाल राधाकृष्णन यांच्या प्रमुख उपस्थितीत महाराष्ट्र राजभवनात शुक्रवारी साजरा करण्यात आला. यावेळी ते बोलत होते. एक भारत श्रेष्ठ भारत उपक्रमांतर्गत राजभवनातर्फे शिवाजी विद्यापीठाच्या सहकार्याने सिक्कीम राज्य स्थापना दिनाचे आयोजन करण्यात आले होते. 'सिक्कीम : अ पॅराडाईज ऑफ इंडिया' हा माहितीपट विद्यापीठ जनसंपर्क कक्षामार्फत तयार करण्यात आला आहे. सिंगापूर व थायलंड जगातील सर्वाधिक पर्यटक आकर्षित करतात. मात्र, भारतात इतक्या नद्या, गड-किल्ले, वारसा शिल्पे व निसर्गसंपदा आहे की, जगातील अर्धे पर्यटक आपण आकर्षिक करू शकतो, असा विश्वास राज्यपाल यांनी व्यक्त केला.

शिवाजी विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांनी सिक्कीमचे लोक नृत्य घोंटू व लोकगीत लेपचा तसेच सिक्कीमचे राज्यगीत उत्कृष्ट सादर केल्याबद्दल राज्यपालांनी विद्यार्थ्यांना कौतुकाची थाप दिली. विद्यापीठाच्या वृत्तविद्या व जनसंवाद विभागातर्फे तयार करण्यात आलेला सिक्कीम राज्यावरील माहितीपट सिक्कीम या पॅराडाईज ऑफ इंडिया दाखविण्यात आला. राज्यपालांचे सचिव डॉ. प्रशांत नारनवरे यांनी प्रास्ताविक केले. अवर सचिव सुशील मोरे यांनी आभार मानले. यावेळी कुलगुरू प्रा. डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, व्यवस्थापन समितीचे सदस्य उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
18 MAY
लोकमत

# ब्रेस्ट कॅन्सरवर किमोथेरपीपेक्षा प्रभावीपणे उपचार करणे शक्य


के. एम. गरडकर


के. डी. सोनवणे


आर. एस. पांडव


एस. एम. आरडे


यु. डी. कदम

## 'वारणा'च्या प्राध्यापकांच्या संशोधनाला आंतरराष्ट्रीय पेटंट

लोकमत न्यूज नेटवर्क

**वारणानगर :** वारणा विभाग शिक्षण मंडळाच्या यशवंतराव चव्हाण वारणा महाविद्यालय येथील रसायनशास्त्र विभागातील डॉ. राजकुमार पांडव, प्रा. सत्यनारायण आर्डे, प्रा. उत्तम कदम, गीतांजली गुरव व राहुल घारगे यांनी विकसित केलेल्या ब्रेस्ट कॅन्सरवरील उपचारास उपयुक्त नॅनोकणांच्या निर्मिती पद्धतीला जर्मन सरकारकडून आंतरराष्ट्रीय पेटंट प्राप्त झाले.

संशोधनासाठी शिवाजी विद्यापीठाच्या रसायनशास्त्र अधिविभागाचे प्रमुख प्रा. डॉ. कैलास सोनवणे आणि ज्येष्ठ प्रा. डॉ. कल्याणराव गरडकर यांचे मार्गदर्शन


गीतांजली गुरव


आर. डी. घारगे

लाभले. ब्रेस्ट कॅन्सर हा महिलांमध्ये आढळणाऱ्या प्रमुख कॅन्सरपैकी एक असून, यामुळे दरवर्षी लाखो महिलांची जीवितहानी होते. सिल्व्हर-झिंक ऑक्साईड नॅनो कॉम्पोझिट वापरून संशोधकांनी ब्रेस्ट कॅन्सरवर किमोथेरपीपेक्षा प्रभावीपणे उपचार करता येणे शक्य असल्याचे सिद्ध केले आहे. या संशोधनाबद्दल वारणा शिक्षण संस्थेचे अध्यक्ष आमदार डॉ. विनय कोरे, कुलगुरु डॉ.डी.टी. शिर्के व मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. विलास कारजीन्नी यांनी सर्व संशोधकांचे अभिनंदन केले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

18 MAY 2025

तरुण भारत

# शिवाजी विद्यापीठ परीक्षा सुरळीत

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठ अंतर्गत २०२४-२५ उन्हाळी सत्रातील पदवी, पदव्युत्तर परीक्षा सुरळीत पार पडल्या. शनिवारी बीए., बीएस्सी., एमबीए., बॅचलर ऑफ लॉ, बी आर्किटेक्ट, एम. लिप. अशा २२ अभ्यासक्रमांच्या परीक्षा १४० परीक्षा केंद्रावर सुरळीत पार पडल्या. २६ हजार ३२७ विद्यार्थ्यांनी ही परीक्षा दिली. तसेच उन्हाळी सत्रातील आतापर्यंत झालेल्या परीक्षांपैकी १३२ अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर झाले आहेत.



जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
18 MAY 2025
पुण्यनगरी

# विद्यापीठाच्या १२ परीक्षांचे निकाल जाहीर

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या उन्हाळी सत्रातील पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या परीक्षा सुरू आहेत. त्याचबरोबर काही अभ्यासक्रमांचे निकाल विद्यापीठाच्या परीक्षा विभागाकडून लावण्यात येत आहेत. शनिवारी एकूण १२ अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर केले. एकूण १३२ अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर करण्यात आले आहेत. दिवसभरात विविध २२ अभ्यासक्रमांच्या परीक्षा वर्णनात्मक पद्धतीने घेण्यात आल्या. तीन जिल्ह्यांतील १४० परीक्षा केंद्रांवर परीक्षा पार पडल्या. या परीक्षांसाठी २६,३२७ विद्यार्थी उपस्थित होते. परीक्षेत गैरप्रकार करणाऱ्या विद्यार्थ्यांवर नियंत्रण ठेवण्यासाठी भरारी पथके स्थापन केली होती. पथकाकडून सांगली जिल्ह्यातून एका गैरप्रकाराची नोंद परीक्षा प्रमाद समितीतर्फे करण्यात आली आहे.

27928
...टी संपर्क
36821